राज्यातील शासकीय निविदा आणि खरेदी प्रक्रियेत सुसुत्रता, पारदर्शकता, गुणवत्ता आणण्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्र. : खरेदी-२०२६/प्र.क्र.२०४/उद्योग-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ जुलै, २०२६.

वाचा:- १) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दि.१५.०७.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

राज्यातील शासकीय निविदा आणि खरेदी प्रक्रियेत सुसुत्रता, पारदर्शकता, गुणवत्ता, नाविन्यपूर्णता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी व्यापक सुधारणा करणेच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५.०७.२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

२. सदर बैठकीमध्ये झालेली विस्तृत चर्चा व त्यामध्ये प्राप्त सूचना उपयुक्त असून त्याकरीता शासकीय खरेदीसंदर्भात सर्वसमावेशक धोरण तयार करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात यावी, असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील शासकीय निविदांद्वारे निश्चित होणाऱ्या प्रकल्प अंमलबजावणीसाठी सक्षम संस्थेची निवड करण्यापासून ते प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्याच्या सर्व टप्प्यांमध्ये तसेच खरेदी प्रक्रिया सर्वसमावेशकता, गुणवत्ता, कालबध्दता व फलनिष्पत्तीपूरक (Outcome Oriented) करण्यासाठी राज्याचे धोरण तयार करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर समितीची रचना व समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील.

१) **समितीची रचना :**

अ.क्र.	अधिकारी व पदनाम	समितीतील पदनाम
१	श्री. राजेश अग्रवाल, मुख्य सचिव	अध्यक्ष
२	श्री. विकासचंद्र रस्तोगी, अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग	सदस्य
३	श्री. एकनाथ डवले, प्रधान सचिव (जलसंपदा विभाग)	सदस्य
४	डॉ.पी.अन्बलगन, प्रधान सचिव (उद्योग विभाग)	सदस्य
५	श्री. श्रावण हार्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो	सदस्य
६	श्री. अश्विन मुदगल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको	सदस्य
७	श्री. अभिजित बांगर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई म.न.पा.	सदस्य
८	श्री. राधाकृष्णन बी., व्यवस्थापकीय संचालकमहा ,जेनको	सदस्य
९	डॉ. कादंबरी बलकवडे, विकास आयुक्त (उद्योग)	सदस्य सचिव

२) **समितीची कार्यकक्षा:**

१) राज्यातील सध्याच्या निविदा आणि खरेदी प्रक्रियेचा अभ्यास करुन, त्यामध्ये असलेल्या त्रुटींचे निराकरण करणे व सदर प्रक्रिया सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्वक (Qualitative), फलनिष्पत्तीपूरक (Outcome Oriented) धोरण ठरविणे.

२) राज्यातील विविध प्रशासकीय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या खरेदी प्रक्रियेच्या निविदा दस्ताऐवज तयार करण्यापासून ते सदर निविदा प्रक्रिया पूर्णत्वास येईपर्यंतच्या सर्व कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास करून खरेदी प्रक्रिया / प्रकल्प अंमलबजावणी संबंधित सर्व बाबी खरेदी धोरणामध्ये अंतर्भूत कराव्यात.

३) आंतरराष्ट्रीय प्रकल्प, केंद्र शासन, इतर राज्य यांच्याद्वारे अवलंबविण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कार्यपध्दतींचा अभ्यास करुन, सदर बाबी / तरतूदी राज्याच्या धोरणामध्ये स्विकारण्यासाठी शिफारशी करण्यात याव्यात.

३. सदर समितीस सहाय्य करण्याकरीता तांत्रिक तज्ञ संस्था / तज्ञ सल्लागारांच्या सेवा घेण्याची मुभा राहील.

४. समितीने आपला अहवाल सर्वसमावेशक धोरणाच्या मसुद्यासह शासनास दोन महिन्यांच्या आत सादर करावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२२१२३६१४८८५२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LAXMIKANT GOPALRAO DHOKE

Digitally signed by LAXMIKANT GOPALRAO DHOKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELD, 2.5.4.20=413BEECA50B65438C7A037917CCF1F24D8CA684B65640DF6372EA731FFAC4DFC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E714BBCD4D43C6782884C7E7A2091F9F1EDC1D97EBB542C48B98FB8C8BDD6CF4, cn=LAXMIKANT GOPALRAO DHOKE
Date: 2026.07.22 12:42:15 +05'30'

(लक्ष्मीकांत ढोके)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-०३२.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवा कल्याण विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
५. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-०३२.
६. सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानसभा सदस्य/मा.विधान परिषद सदस्य.
७. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-०३२.
८. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-०३२.
९. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-०३२.
१०. सर्व समिती सदस्य
११. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१२. सह सचिव (उद्योग-४), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२.
१३. निवडनस्ती (उद्योग-४).